२१७ १०१२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०५

[redacted]

श्री ॥



## चित्रचरित्रासहित

# श्रीगुरु नंद नित्यपाठ

व

## सांप्रदायिक भजन संग्रह.

REFBK-0000803

दुसरी. [ १८३४.

किंमत २ आणे.

श्रीगुरु नारायण जनार्दन नंद महाराज.



संस्थान—वाळकी व लाड जळगांव—जि. नगर.
वास्तव्य—ठाणें—नंदाश्रम.

॥ श्रीगुरुराज समर्थ ॥



चित्रचरित्रासहित

# श्रीगुरु नंद नित्यपाठ

व

## सांप्रदायिक भजन संग्रह.

आवृत्ति दुसरी

मुंबई.

मिती श्रावण वद्य ८ बुधवार शके १८३४.

REFBK-0000803
REFBK-0000803

हें पुस्तक
जे. डी. गोगटे यांनीं गोगटे आणि कंपनीचा छापखाना
चर्नी रोड, मुंबई येथें छापिलें
व
बापू खंडेराव जोशी ( दास माधव ) यांनीं
१२२७, चर्नी रोड, मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

# उपोद्घात.

जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूति ।
देह कष्टविती, उपकारें ॥ ( तुकाराम. )

अहाहा ! वरील अभंगाच्या एकाच चरणांत श्रीतुकोबारायांनीं संत शब्दाची व्याख्या किती मार्मिक, मनोहर, प्रासादिक व अधिकारयुक्त वाणीनें केली आहे ! धन्य भाग्य कीं ज्यांना अशा संतांचा समागम घडला व आपल्या अनंत दोषांची होळी करून शुद्धचित्त व नित्यमुक्त होऊन भगवत् स्वरूपाला पोंचतां आलें. या चरणांत संतांच्या अवतारांचें प्रयोजन त्यांचीं कर्तव्यें व कृत्यें यांचे सूत्रमय सिद्धांतच दिले आहेत. मात्र अशा संतपदाचा खराखरा अधिकारी पुरुष लक्षावधींत एकादाच सांपडतो ! " साधू कोण ह्मणावा पाहीं सर्वां समान जो त्याला " या मयूरोक्तिप्रमाणें जे खरे साधु असतील अशा सत्पुरुषांच्या सेवेनें, समागमानें, दर्शनानें फार तर काय पण केवळ भजन-स्मरणानेंही अनेक पातकांची राखरांगोळी होऊन सद्बोध, सन्मार्ग व सत्पदाची प्राप्ति होते ह्मणून चित्रचरित्र रूपानें वरील कोटींतीलच अशा या महान् प्रसादी पुरुषाचे गुणानुवाद वर्णनाचा अल्प प्रयत्न केला आहे.

यांचें नांव **नारायण जनार्दन नंदमहाराज** असून नगर जिल्ह्यांत **वाळकी** म्हणून एक गांव आहे तेथील हे वृत्तिवंत जोशी आहेत. यांचा जन्म शके १७५२ ज्येष्ठ शुद्ध १० रोजीं झाला. यांनीं आपलें सर्व आयुष्य सद्गुरुसेवा, भगवद्भक्ति, तीर्थयात्रा व जगपरोपकारांत घालविलें असल्याकारणानें यांचें जीवनचरित्र फारच रमणीय झालें आहे पण तें समग्र छापण्याचें प्रस्तुत अशक्य असल्यामुळें पुढें पद्यांत संक्षिप्त वृत्त गोविलें आहे. यांस पत्नी, ३ पुत्र, १ कन्या असा परिवारअसतांही त्याजपासून अलिप्त राहून आपला काळ परमार्थांत घालवून ‘ प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्येणें केला तो भलारे भला ’ ही उक्ति सार्थ करून दाखवीत आहेत. यांच्या सहजावृत्तांत अनेक दैविक चमत्कार घडलेले हजारों मंडळींनीं पाहिले आहेत; पण ते छापूं गेल्यास एक मोठेसें पुस्तक होईल; अर्थात् तो विचार तूर्त बाजूस ठेवणें भाग आहे. यांना अनेक ठिकाणीं मिळालेल्या प्रासादिक मूर्ति, भगवद्दर्शनें व संताशिर्वाद यांची कहाणीही अवर्णनीय आहे. यांचा कृपाप्रसाद झालेल्या प्राण्यास भगवद्दर्शन वा अन्य साक्षात्कार झाला नाहीं असा अभागी क्वचितच सांपडेल. अशा महापुरुषाचा पूर्व सुकृताच्या योगानें अल्पकाल सहवास घडून जो आनंदानुभव आला त्या आनंदोर्मींतच पुढील पद्यांची रचना झालेली आहे. अशा प्रासादिक पुरुषांचे नित्य गुणगायन केल्यानें सद्गुरुप्रसाद व भगवत्कृपा झाल्याचीं अनेक उदाहरणें दृष्टीस पडतात. कारण ‘ मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद,

असें भगवद्वाक्य आहे. यावर विश्वास ठेवून मुद्दाम, सहज, श्रद्धेनें अथवा अश्रद्धेनें कसाही कां होईना याचा नित्यपाठ केल्यास अल्पावधींतच साक्षात्कार घडल्यावांचून राहणार नाहीं.

या पुस्तकाची छोटीशी प्रथमावृत्ति शके १८३२ सालीं प्रसिद्ध केली. अलीकडे दोन वर्षांत महाराजांचें वास्तव्य ठाण्यास झाल्यापासून त्यांच्या सहवासानें त्यांची विद्वत्ता, हरिभक्ति, निस्पृहता, तपस्तेज व अनेक चमत्कृति पाहून इकडील मंडळीस फार चटका लागून राहिला व प्रत्येकास त्यांचें भजन–पूजन–सद्बोध श्रवणाची लालसा वाढत चालली हें पाहून याची द्वितियावृत्ति काढण्याचा संकल्प केला. प्रथमावृत्तीचा सर्व खर्च मुंबईतील रा. गोगटे आणि कंपनीनें सोसून सर्व प्रती फुकट वाटल्या होत्या. परंतु बऱ्याच मंडळींनीं सूचना केल्या कीं, खर्चापुरती किंमत ठेविली तरी चालेल, पण याच पुस्तकांत सद्गुरूचा संपूर्ण नित्यपाठ देऊन शिवाय सांप्रदायिक भजनाचाही संग्रह करावा. असा मंडळीचा उत्साह पाहून केवळ खर्च भागण्यापुरतीच किंमत ठेवून ही आवृत्ति छापून प्रसिद्ध केली आहे. या आवृत्तीचे वेळीं हडप्सर येथील रा. नारायण गजानन देशपांडे ऊर्फ नंददास, ठाणें येथील यशवंत, गजाननादि भक्त मंडळींनीं आपापल्या आनंदोर्मीत केलेली पद्यरचना प्रसिद्धीकरितां पाठविली याबद्दल सर्वांचे आभार मानून ही वेडी वाकडी सेवा श्रीसद्गुरु चरणीं समर्पण करितों.

**प्रकाशक.**

॥ श्रीगुरुराज समर्थ ॥

# श्रीगुरु नंद नित्यपाठ.

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्वमस्यादिलक्ष्यं ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तन्नमामि ॥ १ ॥
स्वानंद परमानंद करप्रसन्नं । ज्ञानस्वरूपं निजबोधरूपं ।
योगींद्रमीड्यं भवरोग वैद्यं । श्रीगुरुं नित्यमहं नमामि ॥ २ ॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनमः ॥

## चरित्रात्मक पद्य.

त्वरा करा बहु पाहुं चला गुरु नारायण नंदा । भक्तिभावें शरण रिघावें सच्चित्सुखकंदा ॥ धृ० ॥ नगरापाशीं क्षेत्र वाळकी तेथें अवतरला । जनार्दनासी पत्नीसह बहु हर्ष

मना झाला ॥ १ ॥ दत्तभक्तिही बाळपणांतचि पूर्ण दिसुनि येई । सप्तम वर्षीं मौंजीबंधन आनंदें होई ॥ २ ॥ नवव्या वर्षीं नवलक्ष्मी ती पर्णुनि घरिं आणी । वर्दळीस ये अभ्यासाला व्यत्यय करि कोणी ॥ ३ ॥ तेरा वर्षें वयास होतां तात जात स्वर्गीं । आपण निघुनी हरिद्वारिं ये विरक्तजन वर्गीं ॥ ४ ॥ नऊ तपाचें आयुष्य ज्यांचें होउनियां गेलें । परमानंद स्वामीच्या त्या पदकमळां धरिलें ॥ ५ ॥ अठरा वर्षें राहुनि तेथें वेदशास्त्र पढुनी । वैद्य ज्योतिषादिकही शिकुनी गांवीं ये निघुनी ॥ ६ ॥ पूर्व पंचविशी तारुण्याची तपामाजिं गेली परोपकारासाठीं हवनीं तनु ही झिजवीली ॥ ७ ॥ संसाराचा अनुभव घेती विरक्त परि असती । जगदुद्धारासाठीं फिरती जेथें जन वसती ॥ ८ ॥ नाना तीर्थें क्षेत्रें हिंडुनि प्रसाद मिळवोनी । निजामशाही तहशिलदारी केली येवोनी ॥ ९ ॥ चमत्कार त्या दावुनि केलें मंदिर दत्ताचें । दर गुरुवारीं दर्शन घेइन वचन घेति त्याचें ॥ १० ॥ लष्कर इंदुर धार बडोदें अनेक संस्थानीं । जाउनि राहुनि रावरंकही नेले उद्धरुनी ॥ ११ ॥ दत्त-

स्थानीं, डंमरखेडीं, डाकुर, गोकर्णीं । सेतूबंधीं नंदिग्रामीं मूर्ति मिळति रमणी ॥ १२ ॥ ब्रह्मनिष्ठ परि लोकांसाठीं पूजा उपचार । संध्या वंदन जपतप साधन करिती आचार ॥ १३ ॥ परोपकारीं तनु झिजवावी गुर्वाज्ञा ह्मणुनी । पाठ चंडिचा करुनी देती देह नित्य हवनीं ॥ १४ ॥ दत्ताची तैं येतां स्वारी ओळख नच राही । प्रश्न उत्तरीं गुप्त प्रगट हो भीड नसे कांहीं ॥ १५ ॥ प्रेत भूत वा समंध बाधा करणी कोटाळीं । सेवे लावुनि मुक्त करीती होय पाप होळी ॥ १६ ॥ ब्रह्मानंदीं सदा डोलती दत्तरूप काया । होउनि गेली कांहीं तुरली प्रपंचांत माया ॥ १७ ॥ कन्यापुत्रीं तसें कलत्रीं प्रेम नसे तितुकें । परमार्थी जे शिष्य तयावर ठेवितात जितुकें ॥ १८ ॥ वयोवृद्ध परि तपस्तेज अति सुवर्णसम कांती । सगुण भक्तिचा महिमा पाहुनि विरती वेदांती ॥ १९ ॥ सर्वांभूतीं समता ठेवी लघुपण घे अंगीं । सहज समाधी लागुनि डोले दत्तभजन रंगीं ॥ २० ॥ मुखास येई सत्यचि होई वाचा-सिद्धि अशी । षड्रिपु अंकित करुनी जाळी आशा ही विवशी ॥ २१ ॥ दत्तस्वारी कधीं कधीं ये

नानाविध रूपें । परस्परांशीं ओळख पटतां वदती साक्षेपें ॥ २२ ॥ भक्तजनांसी सावध करती दर्शन द्या ह्मणुनी । बघतां बघतां गुप्त होति मग मिळति न शोधोनी ॥ २३ ॥ सद्भक्तांसीं स्वप्नामाजीं अकस्मात दिसती । 'भावाठायीं देव वसे' ही प्रचिती दाखविती ॥ २४ ॥ सकाम होती पूर्ण मनोरथ निष्कामीं मुक्त । ऐसा महिमा अगाध बघुनी झालों अनुरक्त ॥ २५ ॥ प्रेमभरें जैं कीर्तन करिती रंग कसा येई । प्रत्यक्षचि तो अनुभव घ्यावा शब्दिं वदों काई ॥ २६ ॥ सरस्वतीच्या वरप्रसादा कोण वेइ शंका । नवीन कविता सहजीं ह्मणतां फिटते आशंका ॥ २७ ॥ प्रपंच साधुनि परमार्थाची जोड करायाचें । दुष्कर व्रत तें करुनि दाविती धन्य धैर्य साचें ॥ २८ ॥ ऐशा परिचें चरित्र गुरुचें किती ह्मणुनि गावें । अल्पमती मी कुंठित झालों नमिलें सद्भावें ॥ २९ ॥ मौन धरोनी स्वस्थ राहिलों, देखुनिया कष्टी । हस्त मस्तकीं ठेवुनि बघती पूर्ण कृपादृष्टी ॥ ३० ॥ ऊठ माधवा सावध होई स्वस्वरुपा पाही । पहातां दिसला सद्गुरु भरला पूर्ण दिशा दाहीं ॥ ३१ ॥

## भूपाळी.

उठा उठा सद्गुरुराया । दासांवरती करा दया ।
समाधींतें उतरोनिया । देहावरि या सत्वरी ॥ १ ॥
गुरुजी उषःकाल झाला । अभ्यासाचा वेळ आला ।
अजपाजपादि मंत्र बोला । शिष्यमेळा तिष्ठतो ॥ २ ॥
आपण समाधींत रमतां । आह्मा कोण उद्धरिता ।
हातीं धरुनी मोकलितां । व्रीदा धक्का लागतो ॥ ३ ॥
द्वारीं दर्शना कारणें । भक्तीं घेतलें धरणें ।
उठोनिया दर्शन देणें । पावन करणें पतितांसी ॥ ४ ॥
आपुल्या चरणाची जी माती । तीच आह्मां भागीरथी ।
स्नान करूं आलों भक्तीं । पुरवा कोड एवढें ॥ ५ ॥
वरदहस्त माथां ठेवा । ध्यावी जन्मभरी सेवा ।
उपदेशाचा मेवा द्यावा । विनवी दास माधव ॥ ३ ॥

## प्रभात वंदन.

नमस्कार तुज अनंत श्रीगुरु नमस्कार तुज अनंत ॥ धृ० ॥
श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि दत्तराज भगवंत ॥ श्रीगुरु० ॥ १ ॥

म. काव्य ३२३

परमानंद कृपाप्रसादी नंदराज गुणवंत ॥ श्रीगुरु० ॥ २ ॥
नारायण गुरुराज दयाळा उद्धरि हा भवजंत ॥ श्री० ॥ ३ ॥
विषयामाजीं डुंबतसें मी क्षणभरि नाहिं उसंत ॥ श्री० ॥ ४ ॥
अगणित पापें करितों कैसे हातीं धरितिल संत ॥ श्री० ॥ ५ ॥
स्वकर्म साधन केलें नाहीं वाटे याची खंत ॥ श्री० ॥ ६ ॥
भवसिंधूंतुनि काढाया मज तूंच एक बळवंत ॥ श्री० ॥ ७ ॥
दास माधवा तारुनि व्हावें जगतीं या यशवंत ॥ श्री० ॥ ८ ॥

## मानस पूजा.

विद्या तपस्तेज सुवर्ण कांती ।
वृद्धत्व देहीं परि पूर्ण शांती ॥
रुद्राक्ष कौपीन विभूति धारी ।
श्रीसद्गुरु नंद भवाब्धि तारी ॥ १ ॥

ऐसी सद्गुरु मूर्ति आणुनि मनीं गंगोदकें न्हाणिली ।
वस्त्रें लेववुनी विभूषित मणी माळा गळां घातली ॥
भाळा चंदन उर्ध्व कुंकुम टिळा लावी उटी केशरी ।
जाती चंपक पुष्पहार तुळसी अर्पीतसे साजिरीं ॥ २ ॥

उंची धूप सुगंधदायक महा नीरांजनें दाविलीं ।
भावें आरति वाद्य गजरें सप्रेम ओवाळिली ॥
भिक्षेची करि सिद्धता षड्रसी पक्वान्न नानापरी ।
होतां भोजन वारिपान करुनी तांबूल देई करीं ॥ ३ ॥
मुद्रा देउनि दक्षिणा रुचिरशीं रंभाफळें श्रीफळें ।
अर्पोनी मग कर्पुरा उजळुनी सप्रेम ओवाळिलें ॥
छत्रें चामर वारुनी गुरुवरी आदर्शही दाविले ।
वाहोनी मग मंत्रपुष्प विधिनें वंदोनिया प्रार्थिले ॥ ४ ॥
विनंती असे श्रीगुरु मायबापा । अती शीणलों
चूकवी जन्मखेपा । घडो साधुची संगती, भक्ति तूझी ॥
परार्थी झिजो ही तनू नित्य माझी ॥ ५ ॥

## नमस्कार सप्तक.

जयाच्या मनीं दत्त त्रैमूर्ति आहे । समाधीमधें नित्य जो त्यास पाहे । सदां सर्वदां बाहि दत्तात्रयासी । नमस्कार हा नंद नारायणासी ॥ १ ॥ जया पूजनीं दत्तमूर्तीच आहे । तसा कीर्तनीं नर्तनीं तोच राहे । कृपादृष्टि पाहे सदां बालकांसी । नमस्कार० ॥ २ ॥ जया पाहतां स्थीर हो चित्तवृत्ती । जया

दर्शनें पातकें दूर होतीं । असा सद्गुरू सद्गुणी ज्ञानराशी । नमस्कार० ॥ ३ ॥ असे बोलका बृहस्पतीसारखा जो । तसा धीर गंभीर ज्ञानी निका जो । जया संगती मूढ हो ज्ञानराशी । नमस्कार० ॥ ४ ॥ जयासन्निधें मोह माया तुटे ती । जयाच्या कृपें दैवतें वश्य होतीं । करी जो सुबोधा सदां सेवकांसी । नमस्कार० ॥ ५ ॥ हकें धाव घाली सदा सेवकाच्या । करोनी कृपा ग्रंथि तोडी भवाच्या । वसे दैन्य कैचें तया सेवकासी । नमस्कार० ॥ ६ ॥ करी पाठ जो नित्य हें स्तोत्र नेमें । परीपूर्ण होती मनांतील कामें । प्रचीती असी येत नारायणासी । नमस्कार० ॥ ७ ॥

## गुरुपादुकाष्टक.

ज्या संगतीनेंच विराग झाला । मनोदरींचा जडभार गेला । साक्षात्परात्मा मज भेटवीला ॥ विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥ १ ॥ सद्योग पंथें घरिं आणियेलें । अंगेंच मातें परब्रह्म केलें । प्रचंड तो बोध रवी उदेला ॥ विसरूं० ॥ ॥ २ ॥ चराचरीं व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला

तयाची । परंपदीं संगम पूर्ण झाला ॥ विसरूं० ॥ ३ ॥ जो सर्वदां गुप्त जनांत वागे । प्रसन्न भक्तां निजबोध सांगे । सद्भक्ति भावा करितां भुकेला ॥ विसरूं० ॥ ४ ॥ अनंत माझे अपराध कोटी । नाणीं मनीं घालुनि सर्व पोटीं । प्रबोध करितां श्रम फार झाला ॥ विसरूं० ॥ ५ ॥ कांहीं मला सेवनही न झालें । तथापि तेणें मज उद्धरीलें । आतां तरी अर्पिन प्राण त्याला ॥ विसरूं० ॥ ६ ॥ माझ्या अहंभाव असे शरीरीं । तथापि तो सद्गुरु अंगिकारी । नाहीं मनीं अल्प विकार झाला ॥ विसरूं० ॥ ७ ॥ आतां कसा मी उपकार फेडूं । हा देह ओंवाळुनि दूर सोडूं । म्यां एक भावें प्रणिपात केला ॥ विसरूं० ॥ ८ ॥ जया वर्णितां वर्णितां वेदवाणी । ह्मणे नेति नेति तिला ते दुरूनी । नव्हे अंत तो पार ज्याच्या रुपाला ॥ विसरूं० ॥ ९ ॥ जो साधुच्या अंकित जीव झाला । त्याचा असे भार निरंजनाला । नारायणाचा भ्रम दूर केला ॥ विसरूं कसा मी गुरुपादुकांला ॥ १० ॥

## नमस्कार सप्तक.

ज्याच्या कृपेचा मज लाभ झाला ॥ जन्मांतरींचा गुरुराज आला॥ श्रीदत्त ऐसा मज बोध केला॥ विसरूं कसा मी गुरु पादुकांला॥ नमस्कार माझा गुरु दत्तात्रयाला ॥ श्री सद्गुरू नंद दयानिधीला ॥ १ ॥ अखंड माझ्या हृदयांत आहे ॥ साबाह्य देहीं परिपूर्ण राहे ॥ टाकूनि मजशीं नाहींच गेला ॥ विस० ॥ नम० ॥ श्रीस० ॥ २ ॥ स्वरूप माझें मज दाखवीलें ॥ देहींच माझें मज हीत केलें ॥ ऐसा जयानें उपकार केला ॥ विसरूं० ॥ नम० ॥ श्रीस० ॥ ३ ॥ संसार व्याळें मज डंखियेलें ॥ परमार्थ बोधें विष ऊतरीलें ॥ माझ्यावरी हा उपकार केला ॥ विसरूं० ॥ नम० ॥ श्रीस० ॥ ४ ॥ शुकादिकांला सुख प्राप्त झालें ॥ तैसेंच तूंरे मजलागी दीलें ॥ मातापिता तूं बंधूहि मजला ॥ विस० ॥ नम० ॥ श्रीस० ॥ ५ ॥ निजात्मरंगीं मज रंगवीलें॥ स्वानंद लेणें मज लेवविलें॥बोधोनि ऐसा परिपूर्ण केला ॥ विस० ॥ नम०॥ श्रीस० ॥ ६ ॥ सुखात्म डोहीं मज बूडवीलें ॥

घेवोनि हस्तें सुख दाखवीलें ॥ विवेक पुरता भव ताप गेला ॥ विसरूं० ॥ नम० ॥ श्रीस० ॥ ७ ॥

## आरती १ ली.

आरती हे नंदराया । परमानंद प्रसादीया । नारायण गुरुमूर्ती । उद्धरावें दीनातें या ॥ धृ० ॥ परपरी दत्तभक्ती । करोनिया गुरुसेवा ॥ तीर्थवासी काळ कंठी । भावें आकळिलें देवा ॥ आरती० ॥ १ ॥ समर्थांच्या प्रसादानें । भूत भविष्य जाणवी ॥ तपस्तेज विद्वत्तेनें । पाखंडातेंही लाजवी ॥ आरती० ॥ २ ॥ भजनांत प्रेमें नाचे । ब्रह्मानंदीं सदा डोले ॥ सहजावृत्ति समाधींत । प्रत्ययाचे बोल बोले ॥ आरती० ॥ ३ ॥ स्वयें कष्ट सोसोनीया । भक्तसंकटें निवारी ॥ जडमूढां ज्ञान देई । दावी रूप साक्षात्कारी ॥ आरती० ॥ ४ ॥ भूतप्रेत दवडोनी । मुक्त करीती तात्काळ ॥ अनन्य हा माधवदास । चरणीं ठेवितसे भाळ ॥ आरती० ॥ ५ ॥

## आरती २ री.

ओंवाळीतों नंदराजा । चरणीं ठेवुनी माथा ॥ पदर मी

पसरितों । नसे मज दुजा त्राता ॥ ओं० ॥ १ ॥ पीडिलों त्रिविधतापें । चित्त थरथरां कांपे । सत्वरीं धांवुनीया । मज रक्षावें बापें ॥ २ ॥ संसार लोभ सारा । वाउगा हा पसारा ॥ न येइ कांहीं कामा । नसे आतां अन्य थारा ॥ ३॥ धन द्रव्य घरदार । सर्व येथेंचि राहणार । न येति सवें कोणी । तुझे पायावरी भार ॥ ४ ॥ सर्व सुख तुझे पायीं । ह्मणुनी ठेविली डोई ॥ मज नको त्यजूं आतां । गजानना पदरीं घेई ॥ ५ ॥

## ॥ विडा ॥

विडा घ्याहो नंदराया । चूर्ण केला कुटोनीया । आवडीनें मुखीं घाला । दासावरी करा दया ॥ धृ० ॥ भक्तिही नागवेली । अविद्येचा केला चूना । वैराग्य पूगीफळ । कात कल्पिला ज्ञाना ॥ १ ॥ वैराग्य जायफळ । क्रिया लवंग सोज्वळ । अष्टभाव वेलदोडे । पत्री भूतदयाबळ ॥ २ ॥ सस्नेह खोबरें हें । द्वैत फोडुनी बदाम ॥ सुमन हा वर्ख खरा । कापूर हा शांती नाम ॥ ३ ॥ निरहंकार कस्तुरी हे । जमवोनी उपचार । माधवदास विडा देई । सद्गुरु करा अंगिकार ॥ ४ ॥

## ॥ प्रार्थना भजन ॥

गुरुराजा । प्राणविसावा माझा ॥ आलों शरण तुला ॥ ॥ १ ॥ गुरुमूर्ती । दे तव भजनीं स्फूर्ती ॥ २ ॥ गुरुराया । निरसी दुस्तर माया ॥ ३ ॥ गुरुनंदा । सन्मति दे मतिमंदा ॥ ॥ ४ ॥ गुरुनाथा । गाइन तव गुणगाथा ॥ ५ ॥ गुरुस्वामी । रमवी मजला नामीं ॥ ६ ॥ गुरुताता । उद्धरि भवि या आतां ॥ ७ ॥ गुरुमाई । राही माधव हृदयीं ॥ ८ ॥

## ॥ शेजारती ॥

आतां स्वामी सुखें निद्रा करा गुरुराया। सद्गुरुनंदा गुरुराया ॥ एकांतातें जाउनि पहुडा विश्रांती घ्याया ॥ १ ॥ तुम्हास जागवीलें आम्हीं आपुलाले हिता । सद्गुरु आपुलाले हिता ॥ दिधले किति हे श्रम कोणी नाणिलें चित्ता ॥२॥ काया नगरीं हृदयमंदिरीं सुमन शेज केली । गुरुला सुमन शेज केली । भक्तीची ही खाट नवविध पदरांनीं विणिली ॥ ३ ॥ भावार्थाची गादी वरती प्रेमें पसरीली । सद्गुरु प्रेमें पसरीली । वैराग्याची चादर वरती शुभ्र हंतरली ॥ ४ ॥ द्वैताचें तें कपाट लावुनि एकांत केला ।

गुरुला एकांत केला ॥ दुर्बुद्धीची गांठ तोडुनि पडदा सोडिला ॥ ॥ ५ ॥ आशा तृष्णा कल्पना या दासी घालविल्या ॥ शांती क्षमा दया यांना सेवेसी दिधल्या ॥ ६ ॥ अलक्ष उन्मनिचा शेला पांघरोन स्वामी । श्रीगुरु पांघरोन स्वामी ॥ स्वानंदामधिं तल्लिन होतां रतलों गुरुनामीं ॥ ७ ॥ पूर्ण समाधिस्थिती पाहतां चित्त स्थीर झालें । माझें चित्त स्थीर झालें ॥ माधवदास रंगीं रंगुनि आनंदें डोले ॥ ८ ॥

# श्रीगुरुनंद पद्यावलि.

## पद १ लें.

भज मन परमानंद । परात्पर सद्गुरु परमानंद ॥ धृ० ॥ कलिमर्यादा शतवर्षांची लंघुनि राही धुंद ॥ १ ॥ अजानु बाहू सुहास्य मुख तें सच्चिद्घन सुखकंद ॥ २ ॥ तुकाराम हें पूर्वाश्रमिचें नाम देत आनंद ॥ ३ ॥ विद्वद्वर्य तपस्वी योगी भोगी ब्रह्मानंद ॥ ४ ॥ हरिद्वार वा ब्रह्मावर्ती राही जो स्वच्छंद ॥५॥ कृपा कटाक्षें ज्याच्या होती ज्ञानवंत मतिमंद ॥ ६ ॥ भक्तजनातें स्वरुपा दावुनि भोगवि आत्मानंद ॥ ७ ॥ अनंत सद्गु-

णि शिष्य त्यांतुनी आज्ञा दिधला नंद ॥ ८ ॥ कृपादृष्टि परि- वार पहावा तारावा शिशुवृंद ॥ ९ ॥ गुणगण गातां भले भागती माधव हा तर मंद ॥ १० ॥

पद २ रें.

नारायण हा स्मरा । सद्गुरु नारायण हा स्मरा ॥ धृ० ॥ भवभयहारक चित्सुखदायक संगति त्याची धरा ॥ १ ॥ सद्बोधामृत श्रवणें मननें भवनदि पार तरा ॥ २ ॥ कोठुनि आलों कोठें जाणें विवेक याचा करा ॥ ३ ॥ अमोल काया जाइल वांया तरणोपाय वरा ॥ ४ ॥ माधव दासा नंदकृपेचा झाला लाभ खरा ॥ ५ ॥

कटाव.

सद्गुरु नंदराज महाराज । राखी दीनाची या लाज ॥ धृ० ॥ श्रीगुरु नाथा, चरणीं माथा, ठेवुनि आतां, पुसतों ताता, कोठुनि आलों, जाणें कोठें, कोण कुणाचा सांगा नातें, मी माझें या भ्रमलों वातें, सद्बोधानें तारा मातें, सुख दुःखाचें कारण सांगा, दैव ह्मणूं तरि देवा का गा, होइन कैसा यांतुन जागा, दंडूं

कैसे कामा रागा; द्वैताद्वैतीं भांडण कांहे, सोहं स्थिति ही कैसी आहे, जागृत्स्वप्न सुषुप्ती राहे, अचलसमाधी योग कसाहे; कोणा गावें, काय करावें, काय शिकावें वा वाचावें, सांगुनि द्यावें, प्रेम भावें, हेंच मागणें आज ॥ राखी दीनाचीo ॥ १ ॥ ठीक माधवा बरवें पुसलें, ॐकाराचें स्थानचि पहिलें, अकारांतुनि येणें झालें, उकार येथें राहणें केलें; मकारामधिं शेवट मिळणें, येणें जाणें मरणें जगणें, चक्र फिरतसे कधि न थांबणें, कोणकु-णाचें नातें धरणें; आज बाप तो पुढल्या जन्मीं, होइल सेवक अथवा स्वामी, तसीच माता कन्या मामी, देहा पुरती ओळख नामीं; ह्मणुनी मोहीं नच गुंतावें, ममतेपासुनि अलिप्त रहावें, सुखदुःखाचें कारण ध्यावें, संचित केलें तें भोगावें; दैव कोणतें त्वां जें केलें, अहंपणानें अंगिं लाविलें, देवा शरण तुं जाउनि बोलें, मीपण अवघें तुला वाहिलें; मग तूं होसी ह्मणीं मोकळा, देहापासुनि होसि वेगळा, सुखदुःखाचा सुटेल चाळा, षड्रिपु तेंव्हां भिती चळचळा; देवालागीं आत्मनिवेदन, करितां राहिल कुठें द्वैतपण, अपाप तुटतें सुखें भांडण, तो मी ऐसें शुद्ध अहंपण; राहतां होसिल देव भक्त तूं, स्थिरचर अवघा

व्यापकही तूं, तिन्ही अवस्था त्रिगुणात्मक तूं, ऐसी सोहं समाधि धरतां, चित्ता येइल कशी व्यग्रता, स्वस्वरुपीं हें विश्व पहातां, ब्रह्मचि येइल तुझिया हातां; तेथें वाचा कुंठित होई, आनंद स्थिति सांगूं कायी, दाखवुं कैसी वस्तू ठायीं; अनुभव घेई, स्थिर मति होई, तेव्हां मजला तें सुख दाव, ऐसें बोले सद्गुरुराव, माधवदास वंदी पाव, झालें सर्वहि काज ॥ राखी दीनाची या लाज ॥ सद्गु० ॥ २ ॥

## पद ४ थें.

गुणवंत सद्गुरू साचा । नारायण नन्द जयाचा ॥ धृ० ॥ नर धन्य जगीं तो साचा । चुके फेरा चौऱ्यांशींचा ॥ दाखवी मार्ग मोक्षाचा । हा प्रसाद श्रीपादाचा ॥ चाल ॥ अद्वैत बोलतां वाणी । मौनावति अवघे प्राणी । हें तत्व सूज्ञची जाणी । इतरां न लाभ तो त्याचा ॥ १ ॥ गुरुमूर्ति सतत त्या हृदयीं । आनंदिं सदोदित राही । तो देही असुनि विदेही ॥ दासावरि समदृष्टी ही ॥ चाल ॥ वमनासम धन गृह मानी ॥ स्त्री पुत्रां तो न जुमानी ॥ परकार्यीं तत्पर पाणी ॥ सत्वशील सत्य

वचनाचा ॥ २ ॥ नैमित्तिक कर्म तयाचें ॥ पाठ ते सप्तशतीचे ॥ भजनामधिं प्रेमें नाचे ॥ गुण गायी श्रीदत्ताचे ॥ ॥ चाल ॥ मग तीर्थ प्रसादा देई ॥ भवबाधा नुरवी कांहीं ॥ घ्या अनुभव लटका नाहीं ॥ नारायण पादरजाचा ॥ ३ ॥

## पद ९ वें.

थाट पूजेचा ॥ नारायण नन्द गुरूचा ॥ धृ० ॥ सुंदर देवगृह बहु दिसतें ॥ मध्यें दत्तमूर्ति ती वसते ॥ मौक्तिकमाला कंठीं रुळते ॥ जगपालक साचा ॥ ना० ॥ १ ॥ शीतळ गंगोदक आणियलें ॥ दत्तात्रयगुरुतें स्नापियलें ॥ गंध भालिं केशारि लावियलें ॥ टिळा कस्तुरीचा ॥ ना० ॥ २ ॥ सुंदर कुसुमें आणिलीं उंचीं ॥ बकुल केतकी तशि चांफ्याचीं ॥ जाइ मोगरा आणि कर्दळिचीं ॥ हार तुळसीचा ॥ ॥ ना० ॥ ३ ॥ अर्पिलीं भगवीं वस्त्रें गुरुला ॥ रौप्यकमंडलु हातीं दिधला ॥ पायिं खडावा श्रीगुरु सजला ॥ तनय अत्रीचा ॥ ना० ॥ ४ ॥ धूप दीप गुरुसी दाखविले ॥ पंचखाद्य नैवेद्य आणिले ॥ प्राणापान मुखानें बोले ॥ ग्रास दे

त्याचा ॥ ना० ॥ ५ ॥ तेथुनि नारायण गुरु उठले ॥ सन्निध प्रभुच्या उभे ठाकले ॥ हातीं सप्तशतीतें धरिलें ॥ पाठ चंडीचा ॥ ना० ॥ ६ ॥ सकाम साधनि जन बहु येती ॥ अष्टांगें ते प्रणाम करिती ॥ तीर्थ प्रसादें कार्य साधिती ॥ मार्ग मोक्षाचा ॥ ना० ॥७॥ मागुनि पंचारति जैं होती ॥ वाद्यें नानापरि वाजविती ॥ भवभीति लव न उरे चित्तीं ॥ प्रताप हा त्यांचा ॥ ना० ॥ ८ ॥ ब्राह्मण मंत्रघोष बहु करिती ॥ श्री चरणावरि पुष्पें वहाती ॥ तीर्थ प्रसादा घेउनि जाती ॥ थाट पाहण्याचा ॥ ना० ॥ ९ ॥ थाट पाहुनी मन बहु धालें ॥ नारायण आनंदें डोले ॥ भवतापाचें दुःख निमालें ॥ सेवक त्यांचा ॥ ना० ॥ १० ॥

## पद ६ वें.

बहुदिनें सुदिन हा आला ॥ प्रभु मजला ॥ गुरु दिसला ॥ मम जन्म सफल हा झाला ॥ धृ० ॥ पूर्वार्जित तें सुकृत फळलें ॥ नारायण गुरुराज भेटले ॥ या भवपाशांतुनि सोडविलें ॥ मम अज्ञपणा घालविला ॥ १ ॥ मार्गशीर्ष बुधवार तृतीया ॥

कृष्ण पक्ष पाहुनि त्या समया ॥ करुणा आली श्रीगुरुराया ॥ उपदेश मला तो दिधला ॥ २ ॥ प्रार्थी नारायण गुरुपायीं ॥ वास घडो नित आपुल्या ठायीं ॥ पतित दर्शनें पावन होयी ॥ पुरवावें या हेतुला ॥ ३ ॥

## पद ७ वें.

पायाचा मी दास ॥ श्रीगुरू ॥ पायाचा मी दास ॥ धृ० ॥ तनु मन धन तुज सर्व अर्पिलें ॥ सोडवि हा भवपाश ॥ ॥ श्रीगुरू० ॥ भजनिं पूजनीं चित्त वसेना ॥ दे शांती चित्तास ॥ श्रीगुरू० ॥ दुर्धर विषयीं मन वावरतें ॥ आवींररे तूं त्यास ॥ श्रीगुरू० ॥ अज्ञानत्वें तुजसि विसरलों ॥ करि तूं ज्ञानप्रकाश ॥ श्रीगुरू० ॥ अमित पातकें मज करिं घडतीं ॥ क्षमा करीं पतितास ॥ श्रीगुरू० ॥ नारायण ही नश्वर काया ॥ वाही त्वच्चरणास ॥ श्रीगुरू० ॥

## पद ८ वें.

भवरोग आज गेला ॥ मनाला मोद बहू झाला ॥ धृ० ॥ वैद्यरूपि सद्गुरू भेटला ॥ बोधामृत औषध दे मजला ॥ अहं-

चात हा विलया गेला ॥ नामचि पथ्याला ॥ मागत नारायण प्याला ॥ भव० ॥ १ ॥

### पद ९ वें.

सरदार गुरू घरचा ॥ असे साचा ॥ मज हुकुम दिला श्रीगुरुनीं करावा नाश षड्रिपुचा ॥ ध्रृ० ॥ गुरु भक्ति खड्गघे हातीं ॥ घे विवेक तव सांगाती ॥ संसार समरावरती ॥ वैराग्य अश्वावर ॥ होइं तूं स्वार आजि साचा ॥ सरदार० ॥ ॥ १ ॥ बा सावध तेथें राहीं ॥ माया तुज पाडिल मोहीं ॥ वेढिती तुला मग साही ॥ लढ ज्ञानबलें निर्वाण तुज पुढें काय पाड त्यांचा ॥ २ ॥ त्वां साहिजणां छेदावे ॥ एकीसी कैद करावें ॥ मग स्वात्मसुखें नांदावें ॥ पाहुनी शौर्य हें तुझें तुला मग मोक्ष वतनाचा ॥ ३ ॥ हें नन्द गुरू जैं सांगे ॥ नारायण जांई वेगें ॥ मन त्याचें किमपि न भंगे ॥ गुरुप्रसाद शिरिं वंदोनि उचालिला विडाहो पैजेचा ॥ सरदार० ॥ ४ ॥

### पद १० वें.

गुरु आस असे ही चित्तीं ॥ ममकरें घडो सेवा ती ॥ गुरु

तुझी ॥ ध्रृ० ॥ तव मूर्ति वसो मम चित्तीं ॥ मम वाणी वदवी कीर्ती ॥ गुरु तुझी ॥ मम चरणासी दे शक्ति ॥ चालवी सर्व क्षेत्रें तीं ॥ गुरु तुझी ॥ चाल ॥ हे नेत्र ॥ तसेच मम श्रोत्र ॥ सकलही गात्र ॥ तुझ्या कामीं तीं ॥ नारायण मागत भक्ती ॥ ॥ गुरु तुझी ॥ १ ॥

## पद ११ वें.

( चाल—उद्धवा शांतवन करजा. )

धन्य मी, धन्य मी, धन्य गुरुकरुणा मजवरि झाली ॥ धन्य मी, धन्य मी, माझी पुण्यावलि उदया आली ॥ धृ० ॥ धन्य मी, मिळविणें जें, तें मिळविलें नुरलें कांहीं ॥ धन्य मी, धन्य मी, माझ्या भाग्याला उपमा नाहीं ॥ धन्य मी धन्य मम दृष्टी चहुंकडे एकता पाही ॥ ( चाल ) भ्रांतीचें मूळ जळालें । संसारिक दुःख गळालें । स्वाज्ञानहि दूर पळालें । जीवता सहज निमाली ॥ धन्य मी० ॥ १ ॥ उपदेश काय हो त्याची, काय मी वाणूं थोरी । पन्नगता हरुनी ज्यानें दाविमली केवळ दोरी। मी जातों जिकडे तिकडे येतसे मुक्ति सामोरी॥ (चाल) गुरुराज अतुल सुखदाता । रोकडें ब्रह्म ये हातां । कर्तव्य

न उरलें आतां । मी मम ही वृत्ति विराली ॥ धन्य मी० ॥ ॥ २ ॥ सद्गुरुनें सद्बोधाचे पाजियले मजला पेले । त्यायोगें माझे सारे तापत्रय विलया गेले । निजरूप दावुनी माझें व्यामोह नाहिंसें केलें ॥ ( चाल ) माझें मज येई हांसे । चिद्घनता मम मज भासे । भव तारक गुरुच्या कांसे । नारायण दृढ मिठि घाली ॥ धन्य० ॥ ३ ॥

# अथ सांप्रदायिक भजनसंग्रह.

## जय जय रामकृष्णहरी । सांवळ्या रामकृष्णहरी ॥

### अभंग.

॥ १ ॥ रूप पहातां लोचनीं । सुख झालें हो साजणी ॥ ॥ १ ॥ तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुत सुकृतांची जोडी । म्हणुनी विठ्ठल आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥

॥ २ ॥ येई येई सद्गुरुराया । नमितों मी तुझ्या पायां ॥ ॥ १ ॥ परमानंदा त्वरें यावें । माझ्या हृदयीं राहावें ॥ २ ॥ भक्तालागीं धांव घ्यावी । लज्जा दीनाची राखावी ॥ ३ ॥ परि-

वार सांभाळावा । देह पायांपाशीं ठेवा ॥ ४ ॥ नारायण नंद-दास । करी एवढीच आस ॥ ५ ॥

॥ ३ ॥ येगे येगे विठाबाई । तूंगे पंढरीचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥ इतक्या सहित त्वां बा यावें, । माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तुझ्या गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

**॥ जय जय विठोबा रखुमाई । सांवळ्या विठोबा० ॥**

॥ ४ ॥ क्षीरसागरींचा हरी । कान्हा यशोदेच्या घरीं ॥१॥ बाळ रांगतो अंगणीं । माथा जावळाची वेणी ॥ २ ॥ दंडीं वाकी पायीं वाळे । हातीं नवनीताचे गोळे ॥ ३ ॥ नामा मुखाकडे पाहे । धन्य यशोदा ती माये ॥ ४ ॥

॥ ५ ॥ देहुडा चरणीं । वाजवीतो वेणू ॥ गोपिका रमणु । स्वामी माझा ॥ १ ॥ देखिलागे माये । यमुनेच्या तिरीं ॥ हात खांद्यावरी । राधिकेच्या ॥२॥ गुंजावर्ण डोळे । शिरीं बाबरझोटी॥ मयुरपिच्छें वेष्टि । शोभतसे ॥ ३ ॥ सगुण मेघश्याम । लावण्य सुंदर ॥ नामया दातार केशवराज ॥ ४ ॥

॥ ६ ॥ आणिक दुसरें मज नाहीं आतां ॥ नेमिलीया चित्ता पासुनीयां ॥ १ ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ॥ जागृतीं स्वपनीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रियां सकळां भाव तो निराळा दुजा नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेत्रीं केली ओळखण ॥ तटस्थ हें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

॥ ७ ॥ आमुचें हें धन विठ्ठलाचें नाम ॥ चांगलें उत्तम नलगे मोल ॥ १ ॥ कदां हे सरेना न नेती तस्कर ॥ अथवा राजे थोर नेईनात ॥ २ ॥ वाऱ्यानें उडेना न बुडे पाण्यांत ॥ न जळे अद्भुत अग्नीमाजीं ॥ ३ ॥ नव्हे डाक लग कोटी सूर्य प्रभा ॥ त्रिभुवनींचा गाभा देवराव ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्याचें नाम हिरे ज्योती ॥ सदा तुह्मीं हातीं घेत जावें ॥ ५ ॥

## निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई । एकनाथ नामदेव तुकाराम ॥

॥ ८ ॥ काय या संतांचे मानूं उपकार ॥ मज निरंतर जागवीती ॥ १ ॥ काय देवा यांसीं व्हावें उतराई ॥ ठेवितां हा पायी जीव थोडा ॥ २ ॥ सहज बोलणें हित उपदेश ॥ करूनी

सायास शिकवीती ॥ ३ ॥ तुका ह्मणे वत्स धेनूचिये चित्तीं ॥ तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

॥ ९ ॥ हेंचि माझें तप हेंचि माझें दान ॥ हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥ १ ॥ हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत ॥ सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ २ ॥ हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म ॥ हाचि नित्य नेम नाम तुझें ॥ ३ ॥ हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ ॥ हेंचि जप ध्यान नाम तुझें ॥ ४ ॥ हेंचि माझें ज्ञान श्रवण मनन ॥ हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥ ५ ॥ हाचि कुळाचार हाचि कुळधर्म ॥ हाचि नित्य नेम नाम तुझें ॥ ६ ॥ हा माझा आचार हा माझा विचार ॥ हा माझा निर्धार नाम तुझें ॥७॥ तुका ह्मणे दुजें सांगायासि नाहीं ॥ नामेंविण कांहीं धन वित्त ॥ ८ ॥

॥ १० ॥ सर्वकाळ डोळां बैसो नारायण ॥ नहो अभिमान आड मध्यें ॥ १ ॥ धाड पडो माझ्या थोरपणावरी ॥ वाचे नारायण उच्चारीना ॥ २ ॥ जळो अंतरींचें सर्व जाणपण ॥ विवादवचन अहंतेचें ॥ ३ ॥ सकळां चरणीं गाळित माझा जीव ॥ तुका ह्मणे भाव एकविध ॥ ४ ॥

॥ ११ ॥ हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता ॥ दुःख निवारिता नारायण ॥ १ ॥ नलगे वाहणें संसार उद्वेग ॥ जडों नेदी पांग देवराव ॥ २ ॥ असों द्यावा धीर सदा समाधान ॥ आहे नारायण जवळीच ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझा सखा पांडुरंग ॥ व्यापियेलें जग तेणें एकें ॥ ४ ॥

## भजन.

## गुरु दत्तात्रय अवधूता । जनार्दनस्वामी एकनाथा गुरु दत्तात्रय ॥

॥ १२ ॥ कलियुगीं तारक । स्वामीं दत्तराज एक ॥ १ ॥ त्याचें नाम नित्य गावें । भव सिंधूसि तरावें ॥ २ ॥ दत्त मूर्ति हृदयीं ध्यातां । पावे मोक्ष सायुज्यता ॥ ३ ॥ दत्त वसे जया मनीं । तया दत्त जनीं वनीं ॥ ४ ॥ एका जनार्दनीं दत्त । सबाह्य स्वानंदभरित ॥ ५ ॥

॥ १३ ॥ दत्त ध्यावा दत्त गावा । दत्त आमुचा विसावा॥ ॥ १ ॥ दत्त अंतर्बाह्य आहे । दत्ताविण कांहीं नोहे ॥ २ ॥ दत्त जनीं दत्त वनीं । दत्तरूप हे अवनी ॥ ३ ॥ दत्तरूपीं लीन वृत्ति । एका जनार्दनीं विश्रांति ॥ ४ ॥

॥ १४ ॥ दत्त माझी माता दत्त माझा पिता । बहिणी बंधु चुलता दत्त माझा ॥ १ ॥ दत्त माझा गुरू दत्त माझा तारूं । मजशीं आधारू दत्तराज ॥ २ ॥ दत्त माझें जन दत्त माझें मन । सोइरासज्जन दत्त माझा ॥ ३ ॥ एका जनार्दनीं दत्त हा विसांवा । न विचारित गांवां जावें त्याच्या ॥ ४ ॥

॥ १५ ॥ दत्त माझी माय । आह्मां अनाथाची गाय ॥ १ ॥ प्रेम पान्हा पाजी वेगीं । गुरू माउली आह्मांलागीं ॥ २ ॥ आह्मां प्रीतीची साउली । श्रीगुरु दत्तराज माउली ॥ ३ ॥ आमच्या जीवींच्या जिवलगे । आह्मांलागीं घे वोसंगे ॥ ४ ॥ एका जनार्दनीं । दत्तराज माय बाहिणी ॥ ५ ॥

॥ १६ ॥ दत्त माझी माय । आह्मां सुखा उणें काय ॥ १ ॥ नित्य प्रीति दत्तनामीं । दत्त वसे गृहग्रामीं ॥ २ ॥ दत्ताविण नसे दुजें । दत्त माय बाप माझे ॥ ३ ॥ दत्तात्रेय दत्तात्रेय । नाहीं काळिकाळाचें भय ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं दत्त । नित्य देखे हृदयांत ॥ ५ ॥

॥ १७ ॥ आमचे कुळींचें दैवत । श्रीगुरुदत्तराज समर्थ ॥ १ ॥ तोचि आमुचा माय बाप । नाशी सकळ संताप ॥ ॥ २ ॥ हेंचि आमुचें व्रत तप । मुखीं दत्त नाम जप ॥ ३ ॥ तयावीण हे सुटका । नाहीं नाहीं आम्हां देखा ॥ ४ ॥ एका शरण जनार्दनीं । दत्त वसे ध्यानीं मनीं ॥ ५ ॥

॥ १८ ॥ वाचे बोला दत्त दत्त । होय सकळ परमार्थ ॥ ॥ १ ॥ दत्तरूपीं लागतां दृष्टी। दत्तरूप अवघी सृष्टी ॥ २ ॥ दत्तकथा वसे कानीं । दत्तमूर्ती ध्यानीं मनीं ॥ ३ ॥ दत्तालागीं आलिंगन । कर समर्थ हे जाणा ॥४॥ एका जनार्दनीं दत्त । सदा वसे हृदयांत ॥ ५ ॥

॥ १९ ॥ धन्य धन्य तेचि नर । दत्त नामीं जे तत्पर ॥ ॥ १ ॥ त्यांचें होतां दर्शन । पतित होताती पावन ॥ २ ॥ तयालागीं शरण जावें । काया वाचा आणि जीवें ॥ ३ ॥ शरण एका जनार्दनीं । त्यांचे पाय आठवी मनीं ॥ ४ ॥

॥ २० ॥ दत्त नामाचा उच्चार । मुखीं वसे निरंतर ॥ १ ॥ तयापाशीं शांती क्षमा । प्राप्त होय निजधामा ॥ २ ॥ सर्व सुखें

[stamp]

तयापाशीं । ऋद्धि सिद्धि त्याच्या दासी ॥ ३ ॥ भुक्ति मुक्ति लोटांगणीं । लागताती त्याच्या चरणीं ॥ ४ ॥ म्हणे एका जनार्दन । मना लागलेंसें ध्यान ॥ ५ ॥

॥ २१ ॥ प्राणियासी मंत्र सोपा । दत्त दत्त वाचे जपा ॥ १ ॥ आणिक नलगे साधन । दत्त नामें घडे ज्ञान ॥२॥ नलगे योगयाग पाही । दत्तावांचून नेणें कांहीं ॥ ३ ॥ एका जनार्दनीं वेधलें मन । मनची झालें उन्मन ॥ ४ ॥

॥ २२ ॥ दत्त दत्त म्हणे वाचे । काळ पाय वंदी त्याचे ॥ १ ॥ दत्तचरणीं ठेवी वृत्ति । होय वृत्तीची निवृत्ति ॥ २ ॥ दत्तरूप पाहे डोळां । वंद्य होय कळिकाळा ॥ ३ ॥ एका जनार्दनीं दत्त । हृदयीं वसे सदोदित ॥ ४ ॥

॥ २३ ॥ खडखड वाजे व्याघ्रांबर । डं डं डमरूचा गजर ॥ १ ॥ वळ वळ वेळांचें भूषण । झुळ झुळ गंगेचें जीवन ॥ २ ॥ भं भं नाद त्या शंखाचा । हर हर शब्द बोले वाचा ॥ ३ ॥ ऐसा शिव चिंतामणि ॥ पाहे तुकयासें निर्वाणी ॥ ४ ॥

## भजन.

गुरु महाराज गुरु ॥ जय जय परब्रह्म सद्गुरु ॥ धृ० ॥
चारी मुक्ती-दायक दाता उदार कल्पतरू ॥ १ ॥
रूप जयाचें मन बुद्धीपर वाचे अगोचरू ॥ २ ॥
अलक्ष अनाम अरूपाद्वय अक्षय परात्परू ॥ ३ ॥
आत्माराम रामदास गोपाळ करुणाकरू ॥ ४ ॥

## पदें.

॥ १ ॥ गौरितनय श्री मंगल मूर्ती मूषकवहनागजवदना ॥ विघ्ननाशना भवभय हरणा, फरशु धारणा पितवसना ॥ धृ० ॥ योगधारणा मुनिमन रमणा भक्त पालना मददमना ॥ वेद भूषणा वंद्य सुरगणा वाग्देवी तव प्रियललना ॥ १ ॥ नन्द-दास नारायण आपणा विनवितसे द्या अवधाना ॥ झडकरि आतां धांउनि यावें ह्या समयां दाखविं चरणा ॥ २ ॥

॥ २ ॥ नंदराज गुरुमाय । सखये नंदराज गुरुमाय॥धृ०॥
तव चरणांचा ध्यास लागुनी न गमे करुं तरि काय॥स०॥१॥
पदकमलांच्या वियोगास्तव होते तळमळ हाय ॥ स० ॥ २ ॥

वेगीं येउनि पान्हा देई वत्साप्रति जशि गाय ॥ स० ॥ ३ ॥
यशवंताची विनती तुजसी करी कृपेची छाय ॥ स० ॥ ४ ॥

॥३॥ गुरूची रम्य मूर्ति दिसते ॥ आनंदानें सप्रेमानें भक्तजना पाहतें ॥ सन्निध काम धेनु वसते ॥ शंखचक्र करिं त्रिशुल विराजे पायिं खडावा ते ॥ भाळीं धरिलें चंद्रातें ॥ तैसिच वरती गंगामाता शांत करी गुरुतें ॥ कटिसी व्याघ्रांबर दिसतें ॥ हातिं कमंडलु कांखे झोळी मागत भिक्षेतें ॥ चरणीं चतुर्वेदही ते ॥ ऋग्, यजु, साम, अथर्वणादी बोलत निशिदिनिं ते ॥ होते स्नानहि गंगेतें ॥ पांचाळेश्वर जाउनि तेथें अनुष्ठान होतें ॥ भिक्षा कोल्हापुरि होते ॥ मग भक्तांचें रक्षण करण्या चौंहिकडे फिरते ॥ मन हें शांतिसुखा घेतें ॥ नारायण हा तल्लिन होई पाहुनि स्वरूपातें ॥

॥ ४ ॥ गुरुचरणीं रत रे ॥ प्राण्या तरासिल हा भव रे ॥ ॥ धृ० ॥ गुरुचरणींचा महिमा वर्णुनी थकला शेषहि रे ॥ पृथ्विपत्र हें करुनि लिही जरी सरस्वती स्वकरें ॥ षड्शास्त्रादी सर्व पुराणें बोलति निशिदिन रे ॥ श्रुति स्मृति आणि चतुर्वेदही

वर्णन करिती रे ॥ परि तें नाहीं झालें रे ॥ गुरु चरणीं ॥ १ ॥ जय विजयादी वेत्र घेउनी गर्जति ललकारे ॥ आठप्रहर त्या ऋद्धी सिद्धी गुरु गुण वर्णिति रे ॥ सर्व चराचर व्यापुनि अवघा गुरु हा उरला रे ॥ अल्पमती नारायण तेथें कितिसें वार्णिल रे ॥ लिहितां मति कुंठित होरे ॥ गुरुचरणीं ॥ २ ॥

॥५॥ जयजय दत्ता जय अवधूता जयमुनित्राता भवहारी । तव गुण गातां यश तव लिहितां सामर्थ्य न या भूमिवरी ॥धृ०॥ येसी झडकरि पावसिं लवकरि भक्त धरिसि करिं व्यवहारीं ॥ मूढ-जनासी ज्ञानी करिसी जन उद्धरिसी अभयकरीं ॥ लंघविसी गिरि पंगू मनुजा मूक वदे वेदहि चारी ॥ भूत यक्ष ग्रहबाधा नुरवी रोग करिसी तूं त्वरित दुरी ॥ तव भेटीस्तव अर्चन करिती जन बसुनीया वनिं विवरीं ॥ नन्द . शिष्य नारायण सेवक त्याचा तूं अभिमान धरी ॥ १ ॥

॥ ६ ॥ हें नमन असो तुज अत्रिसुता ॥ धृ० ॥ सत्व रज तमा सहित अससि तूं ॥ त्रिभुवनिं तव सत्ता ॥ असो० ॥ विधिहरिहर तुह्मी एकवटोनी ॥ कलियुगिं अवतरतां ॥ असो० ॥

भक्तकामना पूर्ण कराया ॥ स्वानंदें रमतां ॥ असो० ॥ मूढ जनासी ज्ञानी करिसी ॥ योगी जन प्रणता ॥ असो० ॥ दुष्टासी तें शासन करुनी ॥ पाळिसि तूं जगता ॥ असो० ॥ नन्दकृपेचा नारायण हा ॥ तूंचि तया जनिता ॥ असो० ॥

॥ ७ ॥ दत्त माझा भक्त सखा तुह्मीं कुणी पाहिला कां ॥ त्रैमूर्ति अत्रितनय अवतरला भूलोका ॥ धृ० ॥ रुद्राक्षी माळ कंठीं ॥ चालतसे स्मरणि बोटीं ॥ सर्वांगीं भस्मउटी ॥ तोचि तुह्मी पाहिलाका ॥ दत्त० ॥ १ ॥ वसनें तीं भगवीं असतीं ॥ शंख चक्र करिं धरिती ॥ वर्णिति ज्या वेद श्रुती ॥ तोचि तुह्मी पाहिलाका ॥ दत्त० ॥ २ ॥ योगी जन ज्या पाहती ॥ नासाग्रीं एकांतीं ॥ नारायण नन्द ध्याती ॥ तोचि तुह्मी पाहिलाका ॥ दत्त० ॥ ३ ॥

॥ ८ ॥ नमितों दत्त पदाला ॥ भक्तीनें जो वश दासाला ॥ धृ० ॥ देइल सौख्य तुह्माला ॥ सद्भावानें भजतां त्याला ॥ ऐशा या समयाला ॥ जगदोद्धारा प्रभु अवतरला ॥ दीनदयाघन वळला ॥ दासा ज्ञानोदय करण्याला ॥ नारायण स्थिर झाला ॥ प्रेमभरानें श्रीपदकमलां ॥ १ ॥

भजन–जयदत्त जयदत्त भजरे मना ॥
दुर्लभ नरदेह येइ ना पुन्हा ॥

॥ ९ ॥ गुरु दत्त दत्त बोला ॥ स्मरा प्रभुला ॥ नर नाम मुखीं जो घेइं तयाचा जन्म सफल झाला ॥ धृ० ॥ आजवरी बहू नामानें ॥ तारिले भक्त श्रीगुरुनें ॥ सांगु मी किती वदनानें ॥ वालिमका सारखा दुष्ट तोहि पण नामानें तरला ॥ गुरु दत्त दत्त बोला ॥ १ ॥ मुखिं राम नाम मारुतिचे ॥ चुकविलें मरण हो त्याचें ॥ हो सार्थक त्या देहाचें ॥ तैसाच मंदमति दुष्ट अजामिळ नामें उद्धरिला ॥ गुरु दत्त दत्त बोला ॥ ॥ २ ॥ ज्ञानेश्वर तुकया भक्त ॥ नामदेव नामिं आसक्त ॥ एकनाथ जनार्दनपंत ॥ श्रीनारायण गुरु नन्द शिष्य तो नामीं रत झाला ॥ गुरु दत्त दत्त बोला ॥ ३ ॥

॥ १० ॥ गुरुरायारे धांव पाव या समया ॥ मी शरण आलों तव पायां ॥धृ०॥ या षड्रिपुंनीं रिपुंनीं ग्रासिलि काया । मम जन्म सकल हा वायां ॥ या संसारीं संसारिं व्यर्थ मी गढलों ॥ तव चरणसेवे अंतरलों ॥ चाल ॥ तुजवांचुनि अन्य न त्राता

॥ या समयीं मज गुरुनाथा ॥ मजसाठीं शिणसिल आतां ॥ बहु दुःखी मी कां न रक्षिसी सदया ॥ मी शरण ॥ १ ॥ नवस करुनीया धनिक उदीमा गेला ॥ लाभ चौगुणि त्यासी झाला ॥ येतांयेतानां तस्कर त्या भेटला ॥ वाटेंत तस्करीं वधिला ॥ चाल ॥ तूं धावत तेथें आला ॥ तस्करासि त्वां वधियेला ॥ धनिकास सजिव त्वां केला ॥ तसें मजलारे कां न रक्षिसी सदया ॥ मी शरण आलों ॥ २ ॥ द्विज सर्वांगीं कुष्ट स्फटिकसम होतें ॥ ऐकुनी आला कीर्तीतें ॥ त्वां पाहियले त्यांसि कृपा दृष्टीतें ॥ घालविलें सर्व कुष्टातें ॥ चाल ॥ तूं भक्तकाज कैवारी ॥ नारायणासि धरि करीं ॥ भव सिंधु सुखें उतरी ॥ तूं आवरिं रे आवरिं आपुली माया ॥ मी शरण आलों० ॥ ३ ॥

॥ ११ ॥ या जगिं जरा नसे सुख कांहीं ॥ गुरुविणें दुजी गति नाहीं ॥ धृ० ॥ पुत्र कलत्रही मित्र कुणाचे ॥ व्यर्थ भ्रम हा पाहीं ॥ या० ॥ धन दौलत अधिकार कुणाचे ॥ क्षणिक सर्व हे राही ॥ या० ॥ महाल कुणाचे बाग कुणाचे ॥ रथ हत्ती घोडे ही ॥ या० ॥ सोडुनि द्यावें माया मोहा ॥

अंतीं यम तो नेई ॥ या० ॥ नारायण हा विनवी गुरुसी ॥ अंतिं त्वत्पद देई ॥ या० ॥

॥ १२ ॥ दोष न देवाचा ॥ हा आपुल्या दैवाचा ॥ ॥ धृ० ॥ पूर्व सुकृतीं जैसें केलें तैसें आतां पावे ॥ पापानें हें ऐसें होतें देवा कां निंदावें ॥ १ ॥ गहूं पेरितां भूमींमाजी सातु कसे उगवावे ॥ दुःख परासी देतां आपणा सौख्य कसें लाभावें ॥ २ ॥ भक्ति न किमपी अंतःकरणीं देव कसा पावे ॥ "जैसें द्यावें तैसें घ्यावें" हें न कसें उमजावें ॥ ३ ॥ ह्मणुनी विनवी नारायण हा सात्विक वृत्ति रहावे ॥ होणें जाणें दैवाविन परि सुकृत कांहिं करावे ॥ ४ ॥

॥ १३ ॥ हे मना सदा कां चंचल ऐसा होसी ॥ दृढ धरी हृदयिं गुरुसी ॥ धृ० ॥ तुज मनपण कोणी दिधलें ॥ हें ध्यानिं नसे तव आलें ॥ परि शोधुनि पाहीं सगळें ॥ कां आत्मसुखाला मुकसी ॥ हे मना० ॥ १ ॥ तव शरिर तुझेंची वैरी ॥ आंत काम क्रोध अपकारी ॥ तूं संगत त्यांची न धरी ॥ तव मार्ग दिसे तुजसी ॥ हे मना० ॥ २ ॥ हें तुझें तूंचिरे

पाही ॥ मग प्रगटे गुरु तव हृदयीं ॥ तुज गुरूंत भेदाचि नाहीं ॥ मग तुझा तूचि बनसी ॥ हे मना०॥ ३ ॥

॥ १४ ॥ विठ्ठलासी स्मरा ॥ सुजनहो ॥ विठ्ठलासी स्मरा ॥ धृ० ॥ चंद्रभागे तिरीं उभा विठ्ठल ॥ पुंडलिका दे वरा ॥ सुजनहो० ॥ दशअवतारा घेउनि त्यानें ॥ रक्षियली ही धरा ॥ ॥ सुजनहो० ॥ अंबरिषाकारणें धांवला ॥ व्रत एकादशि करा ॥ ॥ सुजनहो० ॥ नारायण दिन विनवी हारेला ॥ यांतुनि मज उद्धरा ॥ सुजनहो० ॥ १ ॥

॥ १५ ॥ शिव शंकर शिव सांभ ॥ दयाघन ॥ शिव शंकर शिव सांभ ॥ धृ ॥ वामांकारुढ गिरिजा माता ॥ सव्यांकीं हेरंब ॥ दयाघन ॥ मस्तकिं विलसे गंगा माई ॥ त्यावरती शशि बिंब ॥ दयाघन ॥ अलंकार सर्पाचे शोभती ॥ माळ गळां नररुंड ॥ दयाघन ॥ पार्श्वभागिं ईश्वरगण असती ॥ वाजविती ते शृंग ॥ दयाघन ॥ सन्निध बैसे वाहन नंदी ॥ शिव चरणीं हो भृंग ॥ दयाघन ॥ नन्द कृपेनें ईश्वर चरणीं ॥ नारायण हो दंग ॥ दयाघन ॥

॥ १६ ॥ इंद्रायणि तीर निवासा ॥ जगदीशा ॥ ज्ञानेशा द्या अभय तुह्मी या दासा ॥ ध्रृ० ॥ अलकापुरि ही पावन भूमी॥ झाली तुमच्या पादरजांनीं ॥ वैकुंठचि हें केलें अवनीं ॥ दुर्गतिचा चुकला वळसा ॥ १ ॥ ज्ञानेश्वरि हा दीप उजळिला ॥ भवांधासी मार्ग दाविला ॥ ज्ञानदृष्टि दिधली जगताला ॥ हें नमन तुह्माला शिरसा ॥ २ ॥ नामस्मरणें बहुत तारिले ॥ कृपा कटाक्षें पशु बोलविले ॥ निर्जिवांना सजिवचि केलें ॥ घ्या नारायण त्या सरसा ॥ ३ ॥

॥ १७ ॥ अंजनी सुता हें नमन तुह्मा प्रियभावें ॥ दृढ भक्ति देउनी चरणिं अह्मा लावावें ॥ ध्रृ० ॥ रात्रंदिन आमुच्या मुखीं या नाम वदवावें॥ अहो तुह्मा सारखे भक्त अह्मा बनवावे ॥ ॥ चाल ॥ वाटते भीति आह्माला ॥ षडरिची ॥ वाटते भीति आह्माला ॥ अंतिची ॥ संगती नाहिं आह्माला ॥ साधुची ॥ नारायण घेउनि सत्वर धांवत यावें ॥ अज्ञान कर्दमांतुनीं आह्मा काढावें ॥ अंजनी० ॥ १ ॥

भजन.

भक्त जना सांभाळी ॥ दत्ता येरे वनमाळी ॥

॥ १८ ॥ प्रभु विण कोण कुणाचा वाली ॥ ध्रु० ॥ कर्ता हर्ता तो करवीता मी मम मिथ्या बोली ॥ १ ॥ कोण कुणाचा चाकर मालक व्यर्थचि भाषण खाली ॥ २ ॥ माणिक ह्मणे मातेच्या उदरीं नवमास रक्षण केली ॥ ३ ॥

॥ १९ ॥ लाग लाग सख्या गुरु पायीं ॥ धृ० ॥ एक्या भावें तत्पर होऊन तन मन अर्पण कांहीं ॥ १ ॥ माणिक ह्मणे संग धरी त्याच्या अंगें ब्रह्मचि होई ॥ २ ॥

॥ २० ॥ कोण कुणाचा पिता जगीं या माता ही कवणाची ॥ कन्या सुत ही नसतीं आपुलीं भार्या तर परक्या कडची ॥ बंधु भगिनी सगे सोयरे, आप्त इष्टही संपत्तिची ॥ कुणी नसे या जगीं आपुलें धरी कास बा धर्माची ॥ १ ॥ नंद गुरूला शरणचि जाई नको करूं माति जन्माची ॥ महावाक्य हें आहे जाणा वदली वाणी सखयाची ॥

॥ २१ ॥ कसें बोटांनीं दाखवूं तुला ॥ पहा अनुभव गुरुच्या मुला ॥ ध्रु० ॥ नको सोडुं देंठिंच्या मुळा ॥ सोड अंजुळी आपुल्या कुळा ॥ किती पहाशिल पहा भोंवतें ॥ येतां

जातां सवें आसतें ॥ तुझ्या पाठींपां वागतें ॥ तुझ्या लोचनीं चमकतें ॥ १ ॥ ही खूण त्वां वळखुन ध्यावी ॥ गुरु पुत्रा जाउन पुसावी ॥ तो नेऊन तुज दाखवी ॥ ज्ञानदेवें सांगितली ॥ तेणें मुक्ती ही जोडली ॥ २ ॥

॥ २२ ॥ जन्मा आली वायां गेली भक्ती नाहीं केली ॥ माझें माझें ह्मणुनिया गुंतुनियां गेली ॥धृ०॥ चाल बाई टाक रुका नका करूं बोल ॥ गुरुविण मार्ग नाहीं करिसी बलबल ॥ १ ॥ गळां माळ टीळा टोपी ह्मणती आह्मीं साधू ॥ दया धर्म चित्तीं नाहीं जाणावे ते भोंदू ॥ २ ॥ कलियुगीं घरोघरीं संत झाले फार ॥ वितभर पोटासाठीं हिंडती दारोदार ॥ ३ ॥ वाचुन पढुन शहाणे जाहले ह्मणती आह्मीं संत ॥ परनारी देखुनियां चंचळ झाळें चित्त ॥ ४ ॥ संत ह्मणती केली निंदा निंदा नोहे भाई ॥ तुका शरण अनन्य भावें संतांचिये पायीं ॥ ५ ॥

॥ २३ ॥ राम नाम दोन अक्षर ॥ सुलभ आणि सोपार ॥ आतां मागितलें अपार ॥ शेवटलें गोड तें करागा ॥ १ ॥ रामकृष्ण वासुदेवा ॥ जाणवी जित्रा शिवा वाजवी चिपुळ्या ॥

पायीं घागऱ्या घोळा ॥ २ ॥ धृ० ॥ गाय वासुदेव वासुदेव॥ भिन्न नाहीं आणिका वासुदेव ॥ दान जाणुनि करी हेवा ॥ नांउरे उरी करी ठेवा ॥ ३ ॥ निज घेऊनियां फिरती एक वेळा जाणविती ॥ धरुनी राहावें हो चित्तीं ॥ ना धरी कांहीं काम हातीं गा ॥ ४ ॥ सुपात्रीं सर्व भाव ॥ मी तो सर्वां वासुदेव ॥ जाणताती कृपाळूत्र ॥ जव भिन्न नाहीं ठावगा ॥५॥ जीवदान करीं उदार ॥ अवलोकीं चराचर ॥ नाहीं वासुदेवीं विचार ॥ तुका ह्मणे तया नमस्कार ॥ ६ ॥

॥ २४ ॥ कांहो तुह्मी निर्मळ हारि गुण गाना ॥ नाचत आनंदरूपीं पंढारिसी जाना ॥ धृ० ॥ काय गणिके याती अधिकार मोठा ॥ पापी अजामीळ तोही गेला वैकुंठा ॥ १ ॥ काय नेणों किती तरले अनंत अपार ॥ पंच महादोषी त्यांच्या पापा नाहीं पार ॥ २ ॥ पुत्राचिया मिषें ह्मणे नारायण ॥ कोण हें कर्तव्य तुका ह्मणे त्याचें पुण्य ॥ ३ ॥

॥२५॥ सांगड बांधारे भक्तीची ॥ रघुनाथ नामाची ॥धृ०॥ संसार सागर सागर ॥ भरला जातो पूर ॥ १ ॥ लाटा उस-

ळती विषयाच्या ॥ बहुतां प्रपंचाच्या ॥ २ ॥ माणकोजी बोधला बोधला ॥ हरिनामीं रंगला ॥ ३ ॥

॥ २६ ॥ नामाचा बाजार पंढरी । नामाचा बाजार ॥ ॥ धृ० ॥ नामचि घेतां नामचि देतां होतो कुल उद्धार ॥ पं० ॥ १ ॥ आषाढि कार्तिकी यात्रा भरते ॥ होतो जय जयकार ॥ पं० ॥२॥ ठायीं ठायीं संत मिळुनियां ॥ गाती ब्रह्मचि सार ॥ पं० ॥३॥ गोपाळपूरीं काला होतो ॥ लाह्यांचा भडिमार ॥ पंढरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे या संत सज्जनीं ॥ नारायण सरदार ॥ पंढरी ॥ ५ ॥

॥२७॥ परमार्थाची जोड हवी तर ॥ आशा जिवाची सोड॥ एक दिन काया जाइल वायां ॥ माया मोह हा सोड ॥ पर० ॥ ॥ १ ॥ आई बाबा काका मामा ॥ धन आहे तर गोड ॥ ॥ पर० ॥२॥ देव सोयरा झाला असतां ॥ निघे काळाची खोड ॥ प० ॥ ३ ॥ तोचि करिल पोटाची चिंता ॥ पुरवि मनोरथ कोड ॥ पर० ॥४॥ विषयीं लंपट होउं नको तूं ॥ भवपाशातें तोड ॥ पर० ॥ ५ ॥ वामन सांगे सद्गुरु चरणीं ॥ सत्वर लावी झोड ॥ पर० ॥ ६ ॥

॥ २८ ॥ भांई हुशार रहनाबे । खुदाका नाम जपनाबे ॥ ॥ धृ० ॥ दो दिनकी है जानि दिवानी ॥ तुज अल्लानें दिया ॥ राम भजन बिन खाक होयगी ॥ काल पासमें आया ॥ ॥ भाई० ॥ १ ॥ भात भातकें कपडे पेहने ॥ सुरत बनायी गहिरी ॥ रामनाम बिन मुक्त न होवे ॥ मत करना मगरोरी ॥ भाई० ॥ २ ॥ चोप चोपके पगरी बांधी ॥ खावे पानका बीडा ॥ जब जमजीकी गांठ पडेगी ॥ जायगा नंगा उघडा ॥ भाई० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुनरे गव्हारा ॥ मत करनाबे तोरा ॥ राम भजन तो करते रहेना ॥ क्या करे काल बिचारा ॥ भाई ॥ ४ ॥

॥ २९ ॥ येही संतनकी बानी ॥ साधुराम, येही संत० नकी बानी ॥ धृ० ॥ दवलत अवरत पसम बराबर, मस्त भया निर्वानी ॥ जगमें आकर ऐसा रहेना, क्या राजा क्या रानी ॥ येही संत० ॥ १ ॥ परधन लेखे थूक बराबर, दुजी औरत है नानी ॥ कोई मान करो कोई मूपर मारो, दोनों गंगा जलपानी ॥ ये० ॥ २ ॥ झूटी काया झूटी माया, दो दिनकी

गुजरानी ॥ संपत नहीं तो हात जोडके, दे लोटाभर पानी ॥ ये० ॥ ३ ॥ कहत कमाल सुन भाई साधू, भजन करो निर्वानी ॥ मैं अपना दिल ऐसा समजो बिरला जाने ग्यानी ॥ये० ॥ ४ ॥

॥ ३० ॥ भजोरे भैया राम गोविंद हरी ॥ धृ० ॥ जपतप साधन कछु नहिं लागत । खरचत नहीं गठरी ॥ १ ॥ संतत संपत सुखके कारन । ज्यासो भूल परी ॥ २ ॥ कहत कबीर जिस मुख राम नहीं । वो मुख धूल परी ॥ भ० ॥३॥

॥ ३१ ॥ अब तुम कब सुमरोगे राम ॥ धृ० ॥ गरभ पनोमें हात जुराया ॥ निकल गया बे मान ॥ अब० ॥ १ ॥ बालपनोमें खेल गमाया ॥ तारुन पनमें काम ॥ अ० ॥ २ ॥ हात पांव जब कांपन लागे निकल गया अवसान ॥ अब० ॥ ॥ ३ ॥ झूटी काया झूटी माया ॥ आखर मोत निदान ॥ अब० ॥ ॥ ४ ॥ कहत कबीरा सुन भाई साधु ॥ यही घोडा मैदान ॥ अब तुम कब सुमरोगे राम ॥ ५ ॥

॥ ३२ ॥ दत्त भजनकू दिया कमल मुख गुरू भजन कूं दिया ॥ धृ० ॥ गुरु कृपासे ऐसी उत्तम ॥ सुंदर नरतनु

८०३

पाया ॥ कम० ॥ १ ॥ खाया पीया सुखसे सोया ॥ हुना हुना सो लिया ॥ कम० ॥ २ ॥ ज्या मुख निशिदिन गुरुनाम नहीं ॥ व्हां तुम कछु नहीं किया ॥ कम० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुन भाई साधु ॥ मट्टीच होगी काया ॥ कम० ॥ ॥ ४ ॥ गुरुस्तवनकूं जो नहीं पाया ॥ आया वैसा गया ॥ क० ॥ ५ ॥

॥ ३३ ॥ तीरथ कोन करे ॥ हमारो तीरथ कोन करे ॥ ॥ धृ० ॥ मनमोंही गंगा मनमोंही जमुना ॥ मनमोंही स्नान करे ॥ १ ॥ मनमोंही आसन मनमों कडासन ॥ मनमों धुनी जले ॥ २ ॥ मनमों माला मनमोंही मुद्रा ॥ मनमोंही ध्यान धरे ॥ ३ ॥ कहत कबीरा सुनो भाई साधु ॥ भटकत कोन फिरे ॥ हमारो तीरथ कोन करे ॥ ४ ॥

॥ ३४ ॥ संगत संतनकी करले । जनमका सार्थक कछु करले ॥ संगत ॥ धृ० ॥ उत्तम नरदेह पाया प्राणी । इसका हित कछु करले ॥ सद्गुरुकूं शरण जाके बाबा । जनम मरण दूर करले ॥ सं० ॥ १ ॥ कहांसे आया कहां जावेगा । ये

कछु मालूम करले ॥ दो दिनकी जिनगानी बंदे । हुशार होकर चलरे ॥ सं० ॥ २ ॥ कौन किसीके जोरू लरके ॥ कौन किसीके साले ॥ जबलग अपने पल्लुव पैसा । तबलग मीठा बोले ॥ सं० ॥ ३ ॥ कहत कबीरा सुन भाई साधु । बार बार नहिं आना ॥ आपना हित कछु करले प्यारे । आखर अकेला जाना ॥ संगत ॥ ४ ॥

॥ ३५ ॥ तुमबिन मेरी कोन खबर ले ॥ गोवर्धन गिरीधारीरे ॥ धृ० ॥ मोरमुकुट पीतांबर शोभे ॥ कुंडलकी छब न्यारीरे ॥ तुम० ॥ १ ॥ भरी सभामों द्रौपदी ठारी राखो लाज हमारीरे ॥ तुम० ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरिधर नागर ॥ चरन कमल बलहारीरे ॥ तुम० ॥ ३ ॥

॥ ३६ ॥ अधर धरूनी वेणू । वेणु वाजविला कोणी वेणू ॥ धृ० ॥ प्रातःकाळीं तो वनमाळी । घेउनि जातो धेनू ॥ १ ॥ उभि मी राहें वाट मि पाहें । कधिं भेटेल मम कान्हू ॥ २ ॥ एका जनार्दनिं वाजवि वेणू । जिव झाला तल्लीनू ॥ ३ ॥

॥ ३७ ॥ मना तुजपाशीं, तुजपाशीं । भेटविणें हृषिकेशी ॥ मना० ॥ धृ० ॥ पुण्य पापही तूंच करविसी । नाकीं नरकीं नसी ॥ मना० ॥ १ ॥ सुख दुःखाला कारण तूंची । योनी नाना नाचविशी ॥ म० ॥ २ ॥ काम, राग, मद, मत्सर वैरी । फाटा दे ह्मणें यांसीं ॥ म० ॥ ३ ॥ दास गजानन नित्य विनवितो । ने मज वैकुंठासी ॥ ४ ॥

॥ ३८ ॥ अवधूत दिगंबर मूर्ती । त्रैलोकिं ज्यास वंदीती ॥ धृ० ॥ कृष्णातटिं अति निकट औदुंबरिं वास जयानें केला । ब्रह्मसनातन जो परमात्मा स्थावर जंगम भरला ॥ अव० ॥ १ ॥ कमलासन कमलावर शिवहर त्रिगुणात्मक जो बनला । दास गजानन दत्त पदांवरि अर्पी शिरकमला ॥ २ ॥

॥ ३९ ॥ लाज रखो तुम मेरी ॥ प्रभुजी लाज रखो तुम मेरी ॥ धृ० ॥ जब वैरीनें कबरी पकरी ॥ तबही मान मरोरी ॥ प्र० ॥ १ ॥ मैं गरीब तुम करुणासागर ॥ दुष्ट करत बलजोरी ॥ प्र० ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरिधर नागर ॥ तुम पीता मैं छोरी ॥ प्र० ॥ ३ ॥

॥ ४० ॥ माझी देवपुजा देवपुजा । पाय तुझे गुरुराजा ॥ धृ० ॥ गुरुचरणाची माती ॥ तेचि माझी भागीरथी ॥ माझी० ॥ १ ॥ गुरुचरणाचा बिंदु । तोचि माझा क्षीरसिंधु ॥ माझी० ॥ २ ॥ गुरुचरणाचें ध्यान । तेंचि माझें संध्या स्नान ॥ माझी० ॥ ३ ॥ शिवदिन केसरि पायीं । सद्गुरुवांचुनि दैवत नाहीं ॥ मा० ॥ ४ ॥

॥ ४१ ॥ देव करील दया । तयावरी ॥ धृ० ॥ स्वपर ह्मणुनि मति न धरि चराचरीं ॥ निर्मळ भाव जया ॥ तया० ॥ ॥ १ ॥ व्यापक जो सकलां कमलापती ॥ जाणुनि न धरिं भया ॥ त० ॥ २ ॥ आनंदतनय ह्मणे गुरुचे पायीं ॥ काशी प्रयाग गया ॥ तया० ॥ ३ ॥

॥ ४२ ॥ दत्तपदीं मी गुंग निरंतर ॥ दत्तपदीं मी गुंग ॥ ॥ धृ० ॥ भवभय संकट दुरित निवारी ॥ दुष्टाशा करि भंग ॥ निरं० ॥ १ ॥ सत्संगीं मन रंगो सदोदित ॥ ऐसा दे मज ढंग ॥ निरं० ॥ २ ॥ दत्तनिरंजनिं नरहर मानस ॥ प्रेमें होवो दंग ॥ निरंतर० ॥ ३ ॥

॥ ४३ ॥ दत्तगुरू मनिं ठेवा । जनहो ॥ मनिं कुमती नच सेवा ॥ धृ० ॥ जे नर गुरुचे पाय ध्याती ॥ भव दुःखें त्यांचीं जाती ॥ नच करिती कोणी हेवा ॥ जन० ॥ १ ॥ सखाराम हा दीन बालक ॥ कृपा करीं तूं जगचालक ॥ स्वीकारी ही तूं मम सेवा ॥ जन० ॥ २ ॥

॥ ४४ ॥ तें मन निष्ठुर कां केलें । जें पूर्ण दयेनें भरलें ॥ धृ० ॥ गजेंद्राच्या हांकेसरसें धांउनियां आलें ॥ तें० ॥ १ ॥ प्रल्हादाच्या भावार्थासी स्तंभीं गुरगुरलें ॥ तें० ॥ २ ॥ पांचाळीच्या करुणावचनें कळवळुनी आलें ॥ तें० ॥ ३ ॥ एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें निशिदिनिं पादें रमलें ॥ तें० ॥ ४ ॥

॥ ४५ ॥ झालि संध्या संदेह माझा गेला ॥ आत्माराम हृदयीं शेजे आला ॥ धृ० ॥ चित्तशुद्धि निर्मळ भागीरथी ॥ दया क्षमा यमुना सरस्वती ॥ असिपदीं एकत्र जेथें होती ॥ स्वानुभव स्नान हें गुप्तस्थिती ॥ झा० ॥ १ ॥ सद्बुद्धीचें घातलें शुद्धासन ॥ वरि शांति सद्गुरुकृपा पूर्ण ॥ शमदम आंगीं विभूती उधळण ॥ मुखें उच्चारि केशव नारायण ॥

ज्ञा० ॥ २ ॥ बोध पुत्र जन्मास आला जेव्हां ॥ आशा म्हातारी मरोन गेली तेव्हां ॥ भक्ति बहीण धांवोनी आली गांवा॥ आतां संध्या करूं मी कैंची केव्हां ॥ ज्ञा० ॥ ३ ॥ सर्व कर्में तीं झालीं ब्रह्मार्पण ॥ ऐसें ऐकतां निवती साधुजन ॥ जन नव्हे अवघाची जनार्दन ॥ एका जनार्दनीं लाधली हेचि खूण ॥ ज्ञालि० ॥ ४ ॥

॥ ४६ ॥ दत्तपदीं स्थिर होईं ॥ मना तूं दत्तपदीं स्थिर होईं ॥ धृ० ॥ सगुण निर्गुण द्वैत नाणितां ॥ ऐक्य रुपातें पाहीं ॥ मना० ॥१॥ भुवनत्रयिंया दत्तात्रांचुनी ॥ दुसरें कांहीं नाहीं ॥ मना० ॥ २ ॥ नामरूपा त्यजुनी बापा ॥ अंतरिं दृष्टी देईं ॥ मना० ॥ ३ ॥ दास ह्मणे या दृष्टीनें तूं ॥ दत्तरूपची होईं ॥ मना तूं ॥ ४ ॥

॥ ४७ ॥ भुलुं नको गड्या संसारा । ना येथ सुखाचा वारा ॥ धु० ॥ दुःखाचें मूळ संसार । तुज करिल बहुत बेजार । लोभाचें करूनि मांजर । तुज फिरविल दारोदारा ॥ ना येथ० ॥ १ ॥ मानिसी जया तूं गोत । ते तुझे वैरि

साक्षात । ढकलुनी मोहपाशांत । तुज फिरवितील गरगरा ॥ ना येथ० ॥ २ ॥ कामिनी नव्हे कटियार । प्रेमाचा करिल तुज पार । बा खरूज कोरडी फार । खांजवूं नको खरखरा ॥ ना येथ० ॥ ३ ॥ नको होऊं मना तूं धुंद । धरि विठ्ठल भजनीं छंद । तरि तुटेल हारे भवबंध । कथि गणू करुनि विचारा ॥ ना येथ० ॥ ४ ॥

॥ ४८ ॥ आनंदमूर्ति सद्गुरु पाहतां ॥ अखंड सुख मजला ॥ सखया ॥ धृ० ॥ सत्यवचनीं सत्यप्रतिज्ञ ॥ राखीतो मज भला ॥ १ ॥ शब्दबंधन तोडुनि सहज ॥ मुक्त केलें मजला ॥ २ ॥ सत्य ज्ञानानंद गुरू हा ॥ नित्य भजनीं रमला ॥ ३ ॥

॥ ४९ ॥ जीवनची गुरुनाम ॥ माझें ॥ जीवनची गुरुनाम ॥ धृ० ॥ नाम स्वधर्म नामचि आश्रम ॥ नामचि नित्य नेम ॥ १ ॥ नाम वेदांत नाम सिद्धांत ॥ नामचि कैवल्यधाम ॥ २ ॥ नामचि रंजन नाम निरंजन ॥ नामचि दत्त प्रेम ॥ ३ ॥

॥ ५० ॥ गुरुमायेचे उपकार ॥ विसरूं कसे ॥ श्री गुरुचे उपकार ॥ धृ० ॥ भक्तवत्सल ब्रीद साच कराया ॥ कलियुगिं घे अवतार ॥ १ ॥ भक्तजनांची प्रेमळ माता ॥ लोटी निज प्रेमपूर ॥ २ ॥ सायुज्य सदनीं नेउनी सहज ॥ दत्त श्रमला फार ॥ ३ ॥

॥ ५१ ॥ मग तूं ब्रह्मचि होसिल खास ॥ धृ० ॥ इहपर भोगीं विरती धरुनी ॥ धरिसी सद्गुरु कास ॥ १ ॥ काल्पित सर्व टाकुनि जरि तूं ॥ पावासि निज़ बोधास ॥ २ ॥ एकपणेंविण आत्मस्वरुपीं ॥ मिळसी दत्तपदास ॥ ३ ॥

## उत्तर अभंग.

हनुमंत महाबळी । दाढी रावणाची जाळी ॥ १ ॥ तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ॥ धृ० ॥ ज्यानें साधिलें उड्डाण । केलें लंकेचें दहन ॥ २ ॥ जाळियेली लंका । धन्य धन्य ह्मणे तुका ॥ ३ ॥

बोलिलीं लेंकुरें ॥ वेडीं वांकडीं उत्तरें ॥ १ ॥ क्षमा करा अपराध ॥ महाराज तुह्मी सिद्ध ॥ धृ० ॥ नाहीं विचारिला ॥

अधिकार मी आपुला ॥ क्षमा० ॥ २ ॥ तुका ह्मणे ज्ञानेश्वरा ॥ राखा पायापाशीं थारा ॥ क्षमा० ॥ ३ ॥

शरण शरण एकनाथा । चरणीं माथा ठेविला ॥१॥ नका पाहूं गुण दोष । झालों दास पायाचा ॥ धृ० ॥ आतां तुह्मी उपेक्षितां । नाहीं सत्ता आपुली ॥ नका० ॥ २ ॥ तुका ह्मणे भागवत । केलें श्रुत सकळांसी ॥ नका० ॥ ३ ॥

झालें समाधान ॥ तुमचे देखिले चरण ॥१॥ आतां उठावेंसें मना ॥ हेतु नाहीं नारायणा ॥ धृ० ॥ सुखाळीचें केणें ॥ तेथें सांपडलें पेणें ॥ आतां० ॥ २ ॥ तुका ह्मणे भोग ॥ माझा निवारिला रोग ॥ आतां० ॥ ३ ॥

आज करोनि आरती ॥ चक्र पाणी ओंवाळिती ॥१॥ आज पुरले नवस ॥ धन्य काळ हा दीवस ॥ धृ० ॥ पहा पहा हो सकळ ॥ पुण्यवंत तुह्मी बाळ ॥ आज ॥ २ ॥ तुका वाजवी टाळी ॥ उभा संन्निध जवळी ॥ ३ ॥ आज ॥ धृ० ॥

## आरती.

आरती ज्ञानराजा । महा कैवल्य तेजा ॥ सेविती साधु संत।

दा. क्र. 83



मनु वेधला माझा ॥ आ० ॥ धृ० लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ ॥ आर० ॥ १ ॥ प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ॥ रामा जनार्दनीं । पायीं टकचि ठेलें ॥ आरती० ॥ २ ॥

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरुधामा ॥ सच्चिदानंदमूर्ती ॥ पाय दाखवीं आह्मां ॥ आ०॥ धृ० ॥ राघवें सागरांत ॥ उदकीं पाषाण तारीले ॥ कौतुक तुकोबाचें ॥ अभंग राखिले । आ० ॥ १ ॥ सच्चिदा तूळणेसीं ॥ प्रेम सुखासी आलें ॥ ह्मणुनी रामेश्वरीं ॥ चरणीं मस्तक ठेवीलें ॥ आ० ॥ २ ॥

## प्रार्थना.

घालिन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनिं पाहिन रूप तुझें ॥ प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन । भावें ओंवाळिन ह्मणे नामा ॥ १ ॥

त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बंधुः सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुद्ध्यात्मनावा प्रकृति स्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै--न्नारायणायेति समर्पयामि॥३॥

अच्युतं केशवं रामनारायणं । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरे ॥ श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं । जानकीनायकं रामचंद्र भजेत्॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

नाम गाऊं नाम घेऊं । नाम विठोबाला वाहूं ॥ आह्मी दैवाचे दैवाचे ॥ दास पंढरीरायाचे ॥ १ ॥ टाळ विणा घेऊं हातीं ॥ केशवराज गाऊं गीतीं ॥ २ ॥ नामा ह्मणे लाखोळी सदा ॥ सहस्रनाम वाहूं गोविंदा ॥ ३ ॥

मागणें तुजप्रती एक आहे ॥ देशील तरी पाहे पांडुरंगा ॥ या संतांसी निर्मिलें ॥ आणिक काय मागूं तुज देवा ॥ तुका ह्मणे आतां उदार होई ॥ ठेवीं पायीं संताच्या ॥

ज्ञानदेव तुकाराम । ज्ञानदेव तुकाराम । तुकाराम तुकाराम तुकाराम । दत्त दत्त दत्त ॥ पुंडलीक वरदा हारि विठ्ठल । पार्वतीपते हरहर महादेव । सीताकांत स्मरण जयजय राम ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥ श्रीसखाराम महाराजकी जय । श्रीगोविंद महाराजकी जय । बाळकृष्ण महाराजकी जय । प्रल्हाद महारा-

जकी जय ॥ श्रीतुकाराम महाराजकी जय । श्रीपरमानंद स्वामी महाराजकी जय। श्रीसद्गुरु नारायण नंद महाराजकी जय । सब संतनकी जय । बाळ गोपाळकी जय । श्रीराम जयराम । जय जयराम ॥ हरि विठ्ठल ॥ जय जय सीताराम ॥

## प्रसादी अभंग.

पाहे प्रसादाची वाट ॥ द्यावें धुवोनियां ताट ॥ तुमचें झालिया भोजन ॥ शेष घेऊनी जाईन ॥ झालों एक सवा ॥ तुह्मी अडवुनिया देवा ॥ तुमचें० ॥ तुका ह्मणे चित्त ॥ करुनी राहिलों निवांत ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ॥

पुंडलीक वरदा हरि विठ्ठल । श्री गुरुदेव दत्त ।

॥ श्रीसद्गुरु नारायणनंदमहाराजकी जय ॥

समाप्त.

803
REFBK-0000803
REFBK-0000803